**CNR : MHGA08-000165-2018**

**नि.फौ.ख.क्र.२७/२०१८**
**शासन—वि—किष्टास्वामी**
**निशाणी क्रमांक २४**

सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक १ याची शपथेवर साक्ष
मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव :— श्री रमेश बाबुराव मडावी,
माझे वय :— ५५ वर्षे, धंदा :— वनपाल,
नेमणुक :— वपका, असरअल्ली, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली.

सरतपास : श्री आर.एस.उंदिरवाडे, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता

कोर्टात गैरहजर असलेल्या आरोपीला मी ओळखतो, कारण आरोपीला मी असरअल्ली पोलिस स्टेशन येथे बघितले होते. दिनांक ०३/०३/२०१८ रोजी पोलिसांनी मला असरअल्ली पोलिस स्टेशन येथे बोलाविले. त्यावेळी, आरोपी हा पोलिस स्टेशनमध्ये हजर होता. आरोपीने माझेसमक्ष पोलिसांना गुन्हयाची कबुली दिली आणि त्यानंतर, पोलिसांनी कबुलीजवाब नोंदविला. मला आता निवेदन पंचनामा दाखविण्यात आला असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. निवेदन पंचनामा **नि.क्र.२५** वर आहे. त्यानंतर, पोलिस हवालदार श्री टेकाम, वनपाल श्री व्यंकट गुड्डूरी, आरोपी आणि मी व इतर पोलिस कर्मचारी असे मिळुन मौजा चिंतरवेला येथे गेलो. आरोपीने माझेसमक्ष त्याच्या घराच्या सांदवाडीमधून लाकडी मुसळ पोलिसांना काढून दिले. त्यानंतर, पोलिसांनी माझेसमक्ष लाकडी मुसळ आरोपीकडून जप्त केले आणि जप्तीपंचनामा तयार केला. मला आता जप्तीपंचनामा दाखविण्यात आला असुन, त्यावर माझी, आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. जप्तीपंचनामा **नि.क्र.२६** वर आहे. पोलिसांनी आरोपीकडून जो लाकडी मुसळ जप्त केला, तो मला दाखविल्यास मी ओळखू शकतो.

*आता जप्त केलेला लाकडी मुसळ न्यायालयात उपलब्ध नसल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदाराची सरतपासणी तहकुब करण्याबाबत तोंडी विनंती केली आणि सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराची सरतपासणी पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आली.*

**वा.दा.ब.अ.क.केले** **माझे समक्ष**

स्वा/— स्वा/—

**(डी.डी.फुलझेले)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सिरोंचा.

**(डी.डी.फुलझेले)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सिरोंचा.
दिनांक ०५.०८.२०१९